PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 6, ISSUE 5

# सांगीतिक साहित्य आणि पं. यशवंत देव

प्रा डॉ सुरेंद्र शेजे,
संगीत विभाग प्रमुख (सहयोगी प्राध्यापक)
जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय
दर्यापूर, जिल्हा अमरावती
महाराष्ट्र भारत

पं. यशवंत देव यांची प्रतिभा वैशिष्टयपूर्ण आहे. गीतलेखन हाही कविप्रतिभेचा एक समर्थ अविष्कार आहे. कुठल्याही समृद्ध भाषेत कविता अंगानी, अनेक प्रकारांनी विकसीत होत असते. या विविध रूपांचे सौंदर्य अनुभवण्याची क्षमता निकोप रसिकतेच्या ठिकाणी असावी लागते. बाजारी भावगीत कोणते आणि अभिजात गीत कोणते यातील फरक ओळखण्याची संस्कारिता अवश्य बाळगायला हवी, पण म्हणून गीतलेखन हे काव्यच नव्हे अशी भूमिका घेणे हे कवितेच्या विकासाला मारक ठरणारे आहे.

पं. यशवंत देव स्वत: गीतलेखन करतात त्यांच्या गीतलेखन, कवितालेखनाचा विचार करतांना त्यांच्या साहित्याचाही विचार करणे महत्वाचे आहे. त्यांचा संगीत साहित्य क्षेत्रातला अनुभव विलक्षण समृद्ध आहे त्यांनी शेकडो चालींची निर्मिती केली आहे. चित्रपट, नाटक, संगीतिका, नृत्यनाटय या सर्व प्रकारासाठी त्यांनी संगीत दिले आहे. इतकेच नव्हे तर स्वत: त्यांनी ध्वनिमुद्रणही केले. संगीत दिग्दर्शक, गायक, संयोजक होऊनच ते थांबलेले नाहीत तर त्यांनी स्वत: अनेक गीते देखील लिहिली.

इतका समृद्ध अनुभव फारच थोडयाच्या वाटयाला येत असेल असे या ठिकाणी वाटते. पं. यशवंत देव यांच्या अनुभवाचा, प्रतिभेचा आणि बुद्धीमत्तेचा आवाका लक्षात घेता त्यांनी कलानिर्मितीच्या स्वरूपावर व त्यांच्या साहित्यावर प्रकाश टाकणारे आत्मनिवेदनात्मक पुस्तक लिहावे म्हणून त्यांनी सन १९७८ मध्ये 'शब्दप्रधान गायकी' या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रकाशीत केली.

हे पुस्तक लिहीतांना देव यांनी विद्यार्थी दशेतील, नव्याने शिकू इच्छिणाऱ्या गायक आणि संगीत दिग्दर्शक आपल्या डोळयापुढे वाचक म्हणून ठेवलेला असावा. त्यांनी स्वत:च आखून घेतलेली ही मर्यादा आहे. या मर्यादेत त्यांनी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त होईल असे लिहिले आहे यात शंका नाही. सुगम संगीताच्या क्षेत्रात नव्याने पदार्पण करू पाहणाऱ्या गायकांना आणि संगीत दिग्दर्शकांना या क्षेत्राची विविध अंगे समजून घेण्यासाठी या पुस्तकाची बहूमोल मदत होईल. गायन क्षेत्रात आपल्या जवळ उत्तम गुण असूनही कोणीही आपल्याला वशिला नसल्यामुळे विचारत नाही. अशा मुर्ख, आंधळया

समाधानाचे खोटे पांघरून ओढून ही मंडळी झोपी जातात ही फार मोठी उणीव भरून काढण्याचे महत्वाचे कार्य पं. यशवंत देव यांचे 'शब्दप्रधान गायकी' हे पुस्तक करू शकेल.

हौसी गायक–गायिकांना अत्यंत महत्वाच्या सूचना देवांनी या पुस्तकात केल्या आहेत. म्हणजे अगदी गायकी पासून तर मायक्राफोन पर्यंत म्हणजे तो कसा वापरावा येथपर्यंत त्यांनी या पुस्तकात विवेचन केले आहे. सुगम संगीतावर अशा पद्धतीचे लिहिले गेलेले एकमेव पुस्तक असेल कारण यात ललित संगीताचा विद्यालयीन अभ्यासक्रम कसा आखावा हे सुद्धा या पुस्तकामध्ये सांगीतले आहे. या पुस्तकातील सर्व प्रकरणे वाचल्यानंतर वाचकाला जाणवेल की, सुगम संगीत, भावसंगीत किंवा ललित संगीत हे सुद्धा शिकावे लागते.

शास्त्रीय संगीत किंवा रागदारी संगीत शिकण्याचे जे शास्त्र आहे, तसेच शास्त्र किंवा तशी पद्धत सुगम संगीताच्या बाबतीतही बनवली जाऊ शकते. सुगम संगीताचाही अभ्यासक्रम असू शकतो, शास्त्रीय संगीताच्या पदवी परिक्षा आज घेतल्या जातात, तशाच प्रकारच्या परीक्षा सुगम संगीताच्या ही घेतल्या गेल्या पाहिजे असा यशवंत देवांनी तेंव्हा विचार केला होता. तसेच या पुस्तकाच्या प्रकरणाच्या शेवटी काही मुद्दे उदाहरणे देऊन स्पष्ट केले की, ज्या अयशस्वी रचना आहेत की, त्यात जे दोष राहीले आहेत ते सुद्धा या ठिकाणी विशद करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. सुगम संगीत या विषयाकडे सर्वानीच डोळस दृष्टीने पहावे, कवी, संगीत दिग्दर्शक आणि गायक या सर्वांनी एकत्र येऊन या विषयावर चर्चा करावी व सुगम संगीताला एक वेगळी स्थायी प्रतिष्ठा लाभण्यासाठी प्रयत्न करावेत अशी ईच्छा सुद्धा त्यांनी व्यक्त केली आहे.

यशवंत देवांचे दुसरं साहित्य म्हणजे 'कधी बहर कधी शिशिर' हे आत्मचरीत्र. देव म्हणजे संगीत दिग्दर्शक, गीतकार, सतत संगीताचं चिंतन करणारं हे व्यक्तित्व आहे. त्यामुळे एका मोठया कालखंडात डोकावून पाहतांना ते जे लिहितील त्यातून त्यांचं नेमकं दर्शन घडेल. यामध्ये कधी त्यांच्या लहानपणातील आठवणी आहेत. तर कधी स्वतःच्या संगीत परिचयाचा वेध आहे. कधी संस्कार तर कधी निर्मितीचा शोध आहे.

हे सर्व सांगतांना स्वतःच्या विस्मरणाचा निर्देश ते आवर्जून करतात. संगीतकार म्हणून आपण कसं घडत गेलो हे लिहितांना छोटया छोटया आठवणीमधून खुप काही महत्वाचं येत राहत. सतारवादक म्हणून त्यांचं संगीत क्षेत्रातील कार्य आणि त्यांना विविध भूमिकांनी त्यामध्ये रमंता आलं. त्याच्या अवल्ल दर्जाच्या प्रतिभेनं, चिंतनशिलतेनं, प्रचंड मेहनत करून आणि सचोटीनं, जिद्दीने त्यांनी आजतागायत जे काम केले त्यामुळेच त्यांच नाव मोजक्या संगीतकारांमध्ये मोठया दिमाखाने झळकत आहे. त्यांच्या स्थानाबद्दल त्यांच्या लेखनात कुठेही हा दिमाख म्हणा किंवा अहंभाव, वृथा, अभिमान कुठेही आढळत नाही. आत्मसमर्थनही नाही उलट अतिशय साधं, नितळ पाण्याच्या झऱ्यासारखं हे व्यक्तित्व आहे हे त्यांच्या या 'कधी बहर कधी शिशिर' या आत्मचरित्रात सागीतले आहे.

पं. यशवंत देवांच एक अप्रतिम असं साहित्य म्हणजे 'रियाजाचा कानमंत्र'. पं. यशवंत देवांचे एक वाक्य आहे की, गायन ही गातागाताचं आत्मसात करण्याची विद्या आहे. केवळ वाचून किंवा दुसऱ्याचं गाणं ऐकुण त्या विद्येची शिखर गाठता येणार नाही. त्यासाठी स्वतःच्या अतंरंगात उतरावे लागेल. स्वतःमध्ये एक धारदार व्यक्तिमत्व जोपासावं लागेलं. आपल्या गाण्यातला पहिला सूर उमटण्याच्या आधीचं हे काम करावं लागेल. गाणं त्याचक्षणी सांभाळलं जाऊ शकतं. आणि रियाजाचा कानमंत्र हे पुस्तक पं. यशवंत देवांनी सुप्रसिद्ध भावगीत गायक स्व.गजाननराव वाटवे यांना समर्पित केले आहे. कारण भावसंगीता विषयी सविस्तर चर्चा ज्यामध्ये आहे असं पुस्तक म्हणजे 'शब्दप्रधान गायकी'

यामध्ये भावसंगीतात अतंर्भुत असणारं काव्य, त्याला लागणारी चालं, आणि भावसंगीताचं गायन या तीनही गोष्टीबद्दल अनुभवातून पक्के केलेले विचार पं.यशवंत देवांनी या पुस्तकामध्ये मांडले आहेत.

ओळीतल्या प्रत्येक शब्दाची, शब्दातल्या प्रत्येक अक्षराची आणि अक्षरात असलेल्या प्रत्येक व्यंजन आणि स्वर (अ, आ, इ, ई ) या दोन घटकांची चाल कळायला हवी नाही तर आपण सादर केलेल्या गाण्याचा परिणाम मात्र शुन्य असतो. गायक त्या चालीतील परिणामकारक तत्व आपल्या मनात ते साठवत नाहीत. त्यामुळे अशा गायकाचं गाणं सुरेल असूनही पडलेलं ठरते.

पं. यशवंत देव गाण शिकवितांनां समोरचा गायक म्हणजे शिकणारा ते संपूर्ण गाण आत्मसात करतो की नाही त्यावर फार बारकाईने लक्ष देतात. शिकतांना त्यांच्या माणसीक अवस्थेचाही विचार करतात. त्यांचे होत असलेले हातवारे, त्यांच्या डोळ्यातील ताण, त्यांची बैठक या गोष्टीकडे पं. यशवंत देव फार बारकाईने लक्ष ठेवतात. गायन शिकवणं आणि गायन शिकणं या देवानघेवाणीच्या दोन क्रीयाना शब्दरूप दयायच्या दृष्टीने या साहित्याची निर्मिती झाली. कारण गायन शिकवणारा गुरू आणि ते शिकणारा विद्यार्थी समोरासमोर बसले असतांना जे काही ज्ञान प्रत्यक्ष दिल्या जाते त्या गुरू मुखातून येणाऱ्या ज्ञानांच ग्रहण विद्यार्थ्यांचे कान करीत असतात. समोर बसलेल्या गुरूची वाणी जसं बरच सांगत असते तसं गुरूचे डोळे आणि हाव भाव सुद्धा त्या सागण्याला एक मौलिक परिणाम देत असतात. एक तऱ्हेचा स्पष्टपणा, एक ढंग बहाल करीत असतात. विद्यार्थ्यांनं गायन कला हस्तगत करण्यासाठी आणि उतरोत्तर त्यात प्रगती करण्यासाठी काय करायला हवं, कोणत्या गोष्टी आवर्जुन करायला पाहिजे, केवळ पं.यशवंत देवाजवळचे अनुभव यात मांडून हे विचार या पुस्तक रूपात देवांनी प्रकाशीत केले आहे. अशा प्रकारे या साहित्याची निर्मिती १९९६ मध्ये झाली.

१९८० मध्ये जवळपास पाच वर्ष पं. यशवंत देव अमेरिकेत असतांना त्यांच्या सोबत त्यांची धर्मपत्नी करूणाताई सोबत होत्या. तेथे नेहमी ध्यान व्हायचे तेथून आपल्याला जो अनुभव घ्यायचा त्यातून आपल्या संकल्पना पक्क्या होतात तेंव्हा तेथे ५ ते १० हजार मंडळी रोज ध्यानासाठी बसतं. जराही आवाज नाही, गैरशिस्त नाही, कार्यक्रम आखीव रेखिव, ओशोंची एकंदर जीवनपद्धती पं.यशवंत देवांनी चांगली अनुभवली. हे सर्व पाहून त्यांना एक पुस्तक लिहावसं वाटलं त्याचे नाव 'करूना त्यांची' (त्यांची म्हणजे ओशोंची) या पुस्तकामध्ये जवळपास १०० रूबाया त्यांनी एका महिन्यात लिहिल्या हे एवढं मोठं काम कसं कायं झालं हे त्यांनाही कळलं नाही. ते स्वत: लिहितांना कुठेही मध्ये थांबले नाहीत. त्यांना हिंदी भाषा फारशी जमत नव्हती तरी मात्र ध्यानाच्या निमित्याने ते हिंदी गाणेही लिहू शकले हा त्यांचा अनुभव होता. तसे देवांनी हिंदीचं साहित्यं वाचलं होतं. हिंदी भाषीकांचं सभांषणही ते मन लावून ऐकत असत. या साऱ्यांचा परिणाम असा झाला की, त्यांच्या हिंदी लिखाणात कुठेही मराठीपण आलं नाही. त्यामुळे त्यांचा हिंदीचा संग्रह 'ओशो ही ओशो' हा संग्रह सुद्धा प्रकाशीत झाला.

पं. यशवंत देवांच्या विनोदी काव्यरचनांचा संग्रह 'पत्नीची मुजोरी' म्हणजे विनोदी गीते, विडंबन काव्य, प्रहसन, खुद्कनिका, यांची एक फुलझडीच आहे. विनोदाचे आचार्य श्री प्र.के. अत्रे यांच्या 'झंडूची फुले' बरोबर या फुलझडीची मी तुलना करणार नाही अत्रे यांनी कवितांची विडंबनं केली. देवांनी कविता किंवा गीतांच्या चालीवर विडबंनं रचली. काही स्वतंत्र विडंबनंही लिहिली. विनोदी म्हणाव्यात अशा कविताही केल्या. गीतांच्या चालींच्या आधारावर विडंबंन गीत रचणारे यशवंत देव हे या प्रकारच्या पहिल्या काही विडंबनंकारामध्ये असावेत. यशवंत देव शब्दप्रधान गायकीचे पुरस्कर्ते, शब्द, काल्पनिक, कोटया, शब्दच्छल, शब्दालंकार इत्यादी सगळे विनोद आणि विडंबनाचे रसायनच असते. गायनातल्या शब्दप्रधानतेप्रमाणे देवांनी विडंबंन आणि विनोद यांच्या बाबतीतही शब्दप्रधानतेला महत्व दिले आहे. गद्य विडंबनात तर शब्दप्रधानता असतेच परंतू पद्य विडंबनातही ती आवश्यक असते हे पं. यशवंत देवांनी दाखवून दिले आहे.

जसे .... 'संथ वाहते कृष्णामायी
तीरावरल्या सुख दु:खाची
जाणिव तिजला नाही' याच चालीवर ....
'संथ गातसे कृष्णा बाई
गीतामधल्या स्वर तालांची
जाणिव तिजला नाही' हे मार्मिक विडंबंन गीत त्यांनी रचलं.

'स्वरगंगेच्या काठावरती' या चालीवरून 'चौपाटीच्या बाकावरती' हे विनोदी गीत केले. 'दिवस तुझे हे फुलायचे' या वरून 'स्वत:चे कल्याण साधायचे' हे प्रहसन गीत तसेच 'तोच चंद्रमा नभात' यावर 'घे सखे मला घरात' अशा प्रकारचे विडंबन गीत, प्रहसन गीत, हास्य गीत, विनोदी गीत देवांनी रचून त्यांच्या साहित्यात भर घातली.

विश्वनिर्मितीचा प्रचंड मोठा स्फोट म्हणजे 'अणुध्वम' आणि हास्याचा गडगडात ही दोन्हीही उर्जा निर्माण करणारी महान तत्व आहेत. असं यशवंत देवांचं आध्यत्म मानतं. आपली साहित्य, संगीत आणि कलेतील प्रत्येक निर्मिती स्वानंद आणि लोकानंद यांची उर्जा निर्माण करणारी असावी असं त्यांन मनमन वाटतं म्हणूनच त्यांचे 'नाना' विनोद आणि नाना विडंबन यातील शब्दसुरांची आनंदयात्रा अखंड सुरू असते. पं.यशवंत देवांना गाण्यामधील 'साहित्या' ची ही केवढी जाण आहे. हे आपल्याला त्यांनी केलेली गाणी ऐकतांना जाणवत असतं.

पु.ल.नी 'झाले गेले विसरून जा' या चित्रपटासाठी गाणी लिहायला सांगितली होती. ते स्वत: गीतकार आणि संगीतकार सुद्धा. ही लिहिलेली गाणी बऱ्यापैकी लोकप्रिय झाली. उदा. 'जीवनात ही घडी', 'निळया नभातं चालली' आणि 'तु नजरेने हो म्हटले'. त्यानंतर 'चार लोचनाची दुनीया' हा गीत संग्रह १९६७ मध्ये प्रसिद्ध झाला. ओशोच्या निवडक रूबाया हिंदीतून लिहल्या आहेत. त्या पैकी ....

'समय जो गया, लौट आया नही
यही एक पल है, तुम्हारा सही' किंवा
'जगके इस मेलें मे तुमही तुम्हारे मीत'

आज त्यांच्या गाण्याबद्दल काय सांगायचं, त्यांच्या आनंदाची कल्पना गाण्याजवळ सुरू होते आणि गाण्याजवळचं संपते. गाणं म्हणजे त्यांचा श्वास, त्यांच अवघ अस्तित्व आहे. आज ९० व्या वर्षी ही गायचं म्हटलं तर त्यांना अजिबात कंटाळा येत नाही. नवनवीन कविता शोधणे, त्यांना चाली लावणे आणि त्या सतत सर्वांना ऐकवणे आजही पहिल्या इतक्याच उत्साहानं चालु असतं. पहाटे उठून नवीन काही लिहिणे ही तर त्यांची अनेक वर्षाची सवयचं आहे. कोणत्याही गोष्टीत नियमीतपणा असणं हे त्यांना फार आवडतं.

विज्ञान विषयातील पदवीधर असलेल्या यशवंत देवांचा साहित्याशी वा काव्याशी संबंध त्यांच्या पूर्वायुष्यात आलेला नव्हता. आकाशवाणीने त्यांच्यावर संगीतकार म्हणून पाडगावंकरांच्या निमित्ताने जेंव्हा प्रथम काम सोपवले तेंव्हा पासून देवांनी गाणी वाचावी लागली. या संदर्भात देव म्हणतात, 'ज्या गाण्यानं चाल लावायची त्यातली एक एक ओळ नीट वाचून तिच्यातील लयतत्व आणि त्यातला ताल निवडावा लागतो शब्दांचे अर्थ आणि भाव जाणून घेऊन योग्य त्या स्वरांच्या कोंदणात ते गाणं नीट बसवाव लागतं. संगीतकाराला त्यासाठी गाण्याशी एक विशेष जवळीक साधावी लागते. गाण्याचं अतरंग कसं तयार होतं याची यशवंत देवांची जाण हळू हळू चाली लावता लावता केलेल्या गाण्यांच्या अभ्यासानं वाढत गेली आणि मग स्वत:च देव गाणी लिहू लागले.

## पं. यशवंत देवांचे काही प्रकाशीत ग्रंथ पुढील प्रमाणे

| अ.क्र. | प्रकाशित ग्रंथाचे नाव | |
|---|---|---|
| १ | चार लोचनांची दुनिया | मराठी भावगीत संग्रह |
| २ | साई गीत प्रसाद | श्री साई बाबा चरित्र गीते |
| ३ | पत्नीची मुजोरी | विडंबन गीते, विनोदी कविता |
| ४ | रियाजाचा कानमंत्र | स्वरांचा प्रभावशाली आविष्कार कसा करावा याचे मार्गदर्शन |
| ५ | शब्दप्रधान गायकी | सुगम संगीत विवेचनात्मक ग्रंथ (राज्य पुरस्कार प्राप्त) |
| ६ | करूणा त्यांची | ओशो रजनीश यांच्या विचारावंर अनुभवजन्य १०० रूबाया |
| ७ | ओशो ही ओशो | ध्यान संबंधित हिंदी गीतमाला |
| ८ | या रे सारे गाऊ या | बालकांसाठी गाणी |
| ९ | कृतज्ञतेच्या सरी | विशेष व्यक्तिंविषयी काव्यपंक्ति |
| १० | कधी बहर कधी शिशिर | आत्मचरित्र |
| ११ | गाणारे शब्द | कविता—गीते—संग्रह |
| १२ | जिथे गाभारा तिथेच कळस | मराठी १०० रूबाया |
| १३ | अस्तित्व की करूणा | आध्यात्मिक रूबाया |
| १४ | अक्षर फुले | हिंदी सिने गीताच्या चालीवर स्वतंत्र मराठी गीते |

## संदर्भ ग्रंथ

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शब्दप्रधान गायकी | पं.यशवंत देव | प्रकाशक रामदास भटकळ प्र. आ. १९७८ |
| २ | रियाजाचा कानमंत्र | पं. यशवंत देव | प्रकाशक रामदास भटकळ प्र. आ. १९९६ |
| ३ | आस्वादक संगीत समिक्षा | श्रीरंग संगोराम | दिलीप माझगांवकर, राजहंस प्रकाशन पुणे प्र.आ.२००३ |
| ४ | शब्दसुरांचा सांगाती—य.देव | संपादन—वीना देव | प्रकाशक सविता जोशी— उत्कर्ष प्रकाशन ६८५, प्र.आ.नोव्हें. २००८ |
| ५ | कधि बहर कधि शिषिर | पं.यशवंत देव | अनघा प्रकाशन ठाणे, प्र.आ. जाने.२००४ |
| ६ | प्रतिभावंत गीत संगीतकार—य.देव | अशोक चिटणीस | सौ. सुप्रिया मराठे, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई |